VERTOZ
VERTOZ LIMITED
CIN: L74120MH2012PLC226823
Regd. Office.: 602, Avior Nirmal Galaxy, LBS Marg Mulund (W), Mumbai - 400080, India
Corp. Office: A101, Bldg No. 8, Plot no. 3, Mindspace - Airoli (E), Opp. Airoli Railway Station, Navi Mumbai - 400708, India
t: +91 22 6142 6030
e: corp@vertoz.com
w: www.vertoz.com

08th September 2026

The Manager – Listing Department,
National Stock Exchange of India Limited,
"Exchange Plaza", 5th Floor,
Plot No. C/1, G Block,
Bandra-Kurla Complex,
Bandra (East), Mumbai – 400 051.

**Symbol: VERTOZ**
**Series: EQ**
**ISIN: INE188Y01031**

**Sub: Newspaper Advertisement for completion of dispatch of Notice convening 15th Annual General Meeting along with Annual Report for the FY 2025-2026.**

Dear Sir/Madam,

This is to inform you that pursuant to the Regulation 47 and Regulation 30 read with Schedule III of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find attached the copies of advertisement published on 08th September, 2026 in relation to completion of dispatch of Notice convening the 15th Annual General Meeting along with Annual Report for the Financial Year 2025-2026 Members of the Company in the following Newspapers:

- Financial Express (English Language National Daily Newspaper – All Editions)
- Lakshadeep (Marathi Language Daily Newspaper – Mumbai Edition)

The above information is also made available on the Company's website https://www.vertoz.com/ir/.

This is for your information and records.

Thanking you,

Yours Faithfully,
**For Vertoz Limited**
**(Formerly known as Vertoz Advertising Limited)**
NUPUR JOSHI
Digitally signed by NUPUR JOSHI
Date: 2026.09.08 15:02:45 +05'30'
**Nupur Joshi**
**Company Secretary & Compliance Officer**
**Membership No: A43768**
**Encl: A/a**

# विदर्भात ४० लाख हेक्टरवरील पिके संकटात; ऑगस्टमध्ये ५८ टक्के पावसाची तूट

अमरावती, दि. ७: पावसाचे उशिरा आगमन, सुरवातीची अनिश्चितता, काही भागांत अतिवृष्टी, दुबार-तिबार पेरणी आणि आता ऐन पीकवाढीच्या काळात पडलेला दीर्घ कोरडा खंड, यामुळे यंदाचा मॉन्सून पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांसाठी कृषी आणीबाणीच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, बुलडाणा आणि वर्धा या सहा जिल्ह्यांतील सुमारे ४० लाख हेक्टरवरील कापूस, सोयाबीन, तूर आणि अन्य खरीप पिके उत्पादन संकटात सापडली आहेत.

ऑगस्टमध्ये पावसाची मोठी तूट ऑगस्टमध्ये विदर्भात सरासरी २९७.१ मिलिमीटर पावसाची अपेक्षा असताना प्रत्यक्षात केवळ १२५.५ मिलिमीटर पाऊस झाला. त्यामुळे तब्बल ५८ टक्के पावसाची तूट नोंदली गेली. जिल्हानिहाय परिस्थितीही गंभीर आहे. हवामान बदलाचे चौफेर संकट हवामान बदलामुळे एकाच हंगामात अतिवृष्टी, दीर्घ कोरडा खंड, अचानक मुसळधार पाऊस आणि वाढते तापमान अशी चारही संकटे शेतकऱ्यांसमोर उभी राहत आहेत. त्यामुळे पारंपरिक पर्जन्यमानाच्या आकडेवारीपेक्षा प्रत्यक्ष शेतातील परिस्थितीचे मूल्यांकन करण्याची गरज निर्माण झाली आहे. पश्चिम विदर्भातील परिस्थितीचे तालुकानिहाय वैज्ञानिक मूल्यांकन करून पात्र भागात दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी तिवारी यांनी केली आहे. तसेच ४० लाख हेक्टरवरील पिकांचे तातडीने सर्वेक्षण करून हेक्टरी किमान ५० हजार रुपयांची विशेष मदत द्यावी, अशीही मागणी आहे.

**पावसाची तूट कुठे?**

- अकोला – ८४ टक्के
- अमरावती – ८२ टक्के
- यवतमाळ – ७८ टक्के
- वर्धा – ७३ टक्के
- वाशीम – ७१ टक्के
- बुलडाणा – ६१ टक्के

कर्जवसुलीला संरक्षण, पीकविम्याचे दावे तातडीने निकाली काढणे, कापूस-सोयाबीन-तुरीची हमीभावाने सरकारी खरेदी आणि जलसुरक्षेसाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. ओलावा संपत चालला कापूस सध्या पाते, फुले आणि बोंडे धरण्याच्या अवस्थेत आहे. सोयाबीन फलोरा आणि शेंगा भरण्याच्या टप्प्यात असून, तुरीच्या वाढीवरही कोरड्या हवामानाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. या काळात जमिनीतील ओलावा कमी झाल्याने उत्पाद जुलैमध्ये काही भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळे हंगामाची संचयी पावसाची तूट तुलनेने कमी दिसत असली, तरी शेती केवळ हंगामातील एकूण पावसावर नव्हे, तर सध्याच्या जमिनीतील ओलाव्यावर अवलंबून असते, असे शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी म्हटले आहे.

# अमेरिकेत मियामी विमानतळावर मालवाहू विमानाला अपघात; पाच जणांचा मृत्यू

वॉशिंग्टन, दि. ७: अमेरिकेतील मियामी आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी अमेझॉनचे मालवाहू विमान धावपट्टीवरून घसरून बाहेर गेले आणि या विमानाने अनेक वाहनांना धडक दिल्यानंतर त्याला आग लागली. या दुर्घटनेत किमान पाच जणांचा मृत्यू झाला असून, तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. अन्य दोन जणांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे..



मियामीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे विमान स्थानिक वेळेनुसार दुपारी सुमारे २ वाजता धावपट्टीवरून बाहेर गेले. मृत्यू झालेल्या व्यक्ती विमानातील प्रवासी होत्या की विमानाने धडक दिलेल्या वाहनांमध्ये होत्या, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. हे विमान पोर्तो रिकोच्या सॅन जुआन येथून मियामीला पोहोचले होते. दुर्घटनेनंतर आकाशात काळ्या धुराचे लोट पसरले. मियामी-डेड रेस्क्यू फायरचे प्रमुख रे जदल्लाह यांनी सांगितले की, विमानाच्या कॉकपिटमध्ये पायलट आणि सहपायलट अडकले होते. काही जण कारमध्येही अडकले होते. तर आणखी एक व्यक्ती वाहनाखाली दबली होती. दुर्घटनेनंतर मियामी विमानतळावरील अनेक उड्डाणे काही तासांसाठी थांबवण्यात आली. विमानातून इंधनाची गळतीही होत होती. दुर्घटनेनंतर अनेक तास अग्निशमन दलाचे जवान ही गळती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत होते.

अपघातानंतर प्राइम एअरचे विमान रस्त्याच्या कडेला जाऊन थांबले. तेथे दोन मोठे ट्रकही उभे होते. घटनास्थळावरील छायाचित्रांमध्ये विमान पोटाच्या भागावर पडलेले दिसत होते. आग लागूनही विमानाचा बहुतांश भाग सुरक्षित राहिला. फ्लाइट ट्रॅकिंग वेबसाइटच्या माहितीनुसार, रविवारी दुपारनंतर विमानतळावरील सुमारे २५० उड्डाणांना विलंब झाला. हे विमान ३२ वर्षे जुने बोईंग ७६७ होते. सुरुवातीला या विमानाची निर्मिती प्रवासी वाहतुकीसाठी करण्यात आली होती. दोन दशकांहून अधिक काळ ते अनेक विमान कंपन्यांसाठी प्रवासी विमान म्हणून कार्यरत होते. २०१५ मध्ये त्याचे रूपांतर मालवाहू विमानात करण्यात आले. ही उड्डाणसेवा उत्तर कॅरोलिनास्थित कार्गो कंपनी २१ एअरने चालवली होती.

# अमरावती-नेरपिंगळाई येवती भांबोरा शिरलस परिसरात वाघाची दहशत

अमरावती, दि. ७: नेरपिंगळाई गावा जवळून काही अंतरावर असलेल्या चरणदास इखे नावाच्या शेतकऱ्याचा वाघाच्या हल्ात दुर्दैवी मृत्यू झाला. मात्र काही दिवस उलटून गेल्यावर वनविभागाला वाघ पकडण्यास अपयश आल्याने त्या शेतकऱ्याला मृत्यू नंतरही न्याय मिळू शकला नाही. उलट वनविभागाच्या अपयशा चा फायदा घेत वाघांनी नेरपिंगळाई येवती कवठळ भांबोरा नया वाठोडा शिरलस मोर्शी गावात जनावरावर हल्ला चढविल्यांनी संपूर्ण परिसरात भीतीचे सावट निर्माण झाले आहे.

बरेच ठिकाणी वाघाच्या भिती मुळे शेतात शेतीचे काम करायला मजूर मिळत नसल्याने शेती पडीत पडण्याचा मार्गावर आली असून वाघाचा भीती मुळे अनेक मजुरावर सुद्धा उपासमारीची वेळ आली आहे. वनविभागानी वाघ मिळून येई पर्यंतशेतकऱ्याचानुकसानाचा मोबदला मिळावा ही मागणी शेतकरी करायला लागले आहेत. एकीकडे वाघाची भीती व वनविभागाला वाघाला पकडण्यात येणाऱ्या अपयशा मुळे याचा फायदा केबल चोरटे तर घेणार का ही भीती सुद्धा शेतकऱ्यांना मध्ये निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे वाघाच्या भितीचा फायदा घेत काही रिकाम टेकडे परिसरातील मोकाट कुत्याला पकडून वाघाचा कलर मारून भितीचे वातावर निर्माण करत आहे. वाघाला पकडण्यासाठी वनविभागाला अपयश येत असल्याने भविष्यात कुठल्याही शेतकऱ्याचा वाघाच्या हल्ल्यात जीव गेल्यात याला जबाबदार कोण ही चर्चा परिसरात आहे.

# बांगलादेशात डेंग्यूचा कहर: रुग्णालयांवर वाढला ताण यावर्षी ४२ हजारांहून अधिक रुग्ण, ११७ मृत्यू

ढाका, दि. ७: बांगलादेशमध्ये डेंग्यूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. यावर्षी आतापर्यंत ४२,५९० जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून ११७ जणांचा मृत्यू झाला आहे. सप्टेंबर महिन्यात रुग्णसंख्येत अचानक झालेल्या वाढीमुळे रुग्णालयांवर मोठा ताण आला आहे. आरोग्य तज्ज्ञांनी अंदाज व्यक्त केली आहे की, आगामी काही आठवड्यांत डासांमुळे पसरणारा हा आजार आणखी गंभीर रूप धारण करू शकतो.



बांगलादेशच्या आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत डेंग्यूमुळे किमान ४ रुग्णांचा मृत्यू झाला असून आणखी १,५५८ रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यावर्षी एका दिवसात रुग्णालयात दाखल झालेल्या डेंग्यू रुग्णांची ही सर्वाधिक संख्या आहे.डेंग्यू हा असा आजार आहे, ज्यामुळे ताप, तीव्र डोकेदुखी तसेच जीवघेण्या गुंतागुंती निर्माण होऊ शकतात. गेल्या काही आठवड्यांत डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे २०२३ मध्ये बांगलादेशात झालेल्या आतापर्यंतच्या सर्वात प्राणघातक डेंग्यूच्या उद्रेकाची चिंता पुन्हा वाढली आहे. हे नवे संकट अशा वेळी आले आहे, जेव्हा देशाची आरोग्य व्यवस्था आधीच गोवराच्या देशव्यापी उद्रेकाशी झुंज देत आहे. यावर्षी गोवरामुळे सुमारे १,००० मुलांचा मृत्यू झाला असून, त्यामुळे आरोग्य सुविधांवर मोठा ताण आहे.आरोग्य तज्ज्ञांनी इशारा दिला आहे की, सप्टेंबर महिना ऑगस्टपेक्षाही अधिक धोकादायक ठरू शकतो. विशेष म्हणजे, यावर्षी ऑगस्टमध्येच डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण आढळले होते. जहांगीरनगर विद्यापीठातील वैद्यकीय कीटकशास्त्रज्ञ प्राध्यापक कबीरुल बशर यांनी सांगितले की, सध्याचा कल कायम राहिल्यास या महिन्यात रुग्णालयात दाखल होणाऱ्या डेंग्यू रुग्णांची संख्या ३०,०००च्या पुढे जाऊ शकते. ऑक्टोबरपर्यंत हवामानाची परिस्थितीही डेंग्यूचा संसर्ग वाढण्यास अनुकूल राहण्याची शक्यता आहे. त्यांनी सांगितले की, डेंग्यूचा प्रादुर्भाव अद्याप सर्वोच्च पातळीवर पोहोचलेला नाही. परिस्थिती अशीच राहिल्यास सप्टेंबर हा यावर्षी डेंग्यू संसर्गाचा सर्वात गंभीर महिना ठरू शकतो.

रुग्णसंख्या प्रचंड वेगाने वाढल्यामुळे रुग्णालयांमध्ये बेडची मोठी कमतरता निर्माण झाली आहे.ढाक्यात डेंग्यू रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर प्राध्यापक तारिक आलम यांनी सांगितले की, ताप कमी झाल्यानंतर डेंग्यू रुग्णांची प्रकृती झपाट्याने बिघडू शकते. या काळात प्लाझ्माची गळती, रक्तदाब कमी होणे, शॉक आणि गंभीर रक्तस्राव यांसारख्या गुंतागुंती निर्माण होऊ शकतात.त्यामुळे तापानंतरच्या या महत्त्वाच्या टप्प्यात रुग्णावर बारकाईने लक्ष ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी इशारा दिला की, पोटदुखी, चक्कर येणे आणि असामान्य सुस्ती यांसारखी लक्षणे अजिबात दुर्लक्षित करू नयेत.

प्राध्यापक बशर यांनी सांगितले की, एडीस डासांचा प्रसार ढाका आणि इतर प्रमुख शहरांपुरता मर्यादित न राहता आता ग्रामीण तसेच जिल्हास्तरीय भागांपर्यंत पोहोचला आहे. देशातील सर्व ६४ जिल्ह्यांमधून डेंग्यूचे रुग्ण आढळले आहेत. मात्र, सर्वाधिक रुग्ण अद्याप राजधानी ढाक्यातच आहेत. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात घेऊन सरकारनेही प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक वेगाने राबवण्यास सुरुवात केली आहे. पंतप्रधान तारिक रहमान यांनी देशव्यापी स्वच्छता आणि जनजागृती अभियान राबवण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी नागरिकांना साचलेले पाणी आणि डासांची पैदास होणारी इतर ठिकाणे नष्ट करण्याचे आवाहन केले आहे. तसेच डास नियंत्रणाच्या उपाययोजनांमध्ये जास्तीत जास्त सामुदायिक सहभाग घेण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

प्राध्यापक बशर यांनी स्पष्ट केले की, डासांची पैदास होण्याची ठिकाणे तशीच राहिली तर केवळ धूर फवारून डेंग्यूवर नियंत्रण मिळवता येणार नाही. डासांवर नियंत्रण मिळवण्यासाठी एडीस डास ज्या भागांमध्ये प्रत्यक्षात पैदास होत आहेत, त्या ठिकाणांना लक्ष्य करावे लागेल

# वर्धा जिल्ह्यातील ८ गावांना हक्काची स्मशानभूमी नाही

वर्धा, दि. ७: देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण झाली असतानाही सेलू तालुक्यातील आठ गावांमध्ये आजवर हक्काची स्मशानभूमी उपलब्ध झालेली नाही. एकीकडे 'समृद्ध महाराष्ट्र' आणि तालुक्यात विकासाचा झंझावात सुरू असल्याचे चित्र उभे केले जात असताना, दुसरीकडे नागरिकांना मरणानंतरही अंत्यसंस्कारासाठी जागा शोधण्याची वेळ येत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

सेलू तालुक्यातून समृद्धी महामार्ग जात असून त्याची भव्यता विकासाचे प्रतीक म्हणून मांडली जात आहे. मात्र, ग्रामीण भागातील मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांची अवस्था अद्यापही बिकट आहे. विशेषतः पावसाळ्यात शेताकडे जाणारे पांदण रस्ते चिखलाने माखल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.या परिस्थितीपेक्षा गंभीर बाब म्हणजे तालुक्यातील आठ गावांमध्ये अंत्यसंस्कारासाठी कायमस्वरूपी आणि अधिकृत स्मशानभूमीची जागाच निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे या गावांमध्ये स्मशानभूमीचे शेड किंवा आवश्यक सुविधा उभारण्याचा प्रश्नही निर्माण होत नाही. पावसाळ्यात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास अंत्यसंस्कारासाठी जागा आणि योग्य व्यवस्था उपलब्ध करून देणे गावकऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे.

**निधी मंजूर, मात्र खर्चासाठी जागेचा पेच**

धक्कादायक बाब म्हणजे, या आठ गावांपैकी काही ग्रामपंचायतींना स्मशानभूमीच्या शेडसाठी शासनाकडून निधी मंजूर झाल्याची माहिती आहे. मात्र, स्मशानभूमीसाठी हक्काची जागाच उपलब्ध नसल्याने मंजूर निधी खर्च करायचा कुठे, असा प्रश्न ग्रामपंचायत प्रशासनासमोर उभा ठाकला आहे.जागेचा शोध घेत असताना वर्षानुवर्षे उलटत आहेत. मात्र, अद्यापही कायमस्वरूपी तोडगा निघालेला नसल्याने शासनाच्या योजना आणि त्यांच्या अंमलबजावणीतील दरी अधोरेखित होत आहे.

**'लोकवस्ती आहे, मग स्मशानभूमीची जागा का नाही..?'**

गावात लोकवस्ती असताना नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी हक्काची जागा का उपलब्ध करून दिली जात नाही, असा थेट सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. तात्पुरत्या स्वरूपात कुठेतरी अंत्यसंस्काराची व्यवस्था केली जात असली, तरी मूलभूत सुविधांनी युक्त आणि कायमस्वरूपी स्मशानभूमी मिळणे हा नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.आता या गंभीर समस्येकडे वरिष्ठ प्रशासन कधी लक्ष देणार, त्या आठ गावांना हक्काची स्मशानभूमीची जागा कधी उपलब्ध करून दिली जाणार आणि लोकप्रतिनिधी यावर कोणता ठोस तोडगा काढणार, याकडे संपूर्ण सेलू तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# नांदगाव खंडेश्वर तालुक्यात महत्त्वाची पदे रिक्त; पशुपालकांची गैरसोय


अमरावती, दि. ७: नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्याने विभागाचा कारभार सध्या प्रभारी अधिकाऱ्यांच्या भरवशावर सुरू असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. नियमित अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे तालुक्यातील पशुपालक शेतकऱ्यांना जनावरांवर वेळेवर उपचार करून घेण्याबरोबरच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवितानाही अडचणींचा सामना करावा लागत असल्याची चर्चा आहे. तालुक्यात पशुसंवर्धन विभागातील सहायक उपायुक्त पशुसंवर्धन तसेच तालुका पशुसंवर्धन अधिकारी ही महत्त्वाची पदे रिक्त असल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय ग्रामीण भागातील अनेक पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये डॉक्टर व परिचरांची पदेही रिक्त असल्याने पशुपालकांची चिंता वाढली आहे. मनुष्यबळाअभावी उपलब्ध अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असून, त्याचा परिणाम पशुवैद्यकीय सेवांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सहायक उपायुक्त पशुसंवर्धन, तालुका पशुसंवर्धन अधिकारी, लोणी येथे डॉक्टर व परिचर, वाढोणा रामनाथ येथे डॉक्टर व परिचर, धामक येथे डॉक्टर, मंगरूळ चव्हाळा येथे डॉक्टर, फुबगाव व निरसना येथे परिचर पद रिक्त आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पशुपालन व्यवसाय केला जात असून, अनेक शेतकऱ्यांसाठी जनावरे हे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन आहे. दूध उत्पादन तसेच शेतीपूरक व्यवसाय म्हणून पशुपालनावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यामुळे जनावरांमध्ये अचानक आजारांचा प्रादुर्भाव झाल्यास किंवा एखाद्या जनावराची प्रकृती बिघडल्यास त्याला वेळेवर पशुवैद्यकीय सेवा मिळणे अत्यंत आवश्यक असते. मात्र, विविध पशुवैद्यकीय दवाखान्यांतील रिक्त पदांमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असल्याने ग्रामीण भागातील पशुपालकांना वेळेवर सेवा मिळण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. जनावरांचे लसीकरण, आजारांवरील उपचार, कृत्रिम रेतन, रोगनियंत्रण तसेच शासनाच्या विविध पशुसंवर्धन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुरेसे अधिकारी व कर्मचारी उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र, विभागातील महत्त्वाची पदे दीर्घकाळ रिक्त राहिल्यास या सर्व सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचा थेट फटका पशुपालक शेतकऱ्यांना बसू शकतो.

नांदगावखंडेश्वर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे तातडीने भरून विभागाचा कारभार सक्षम करण्याची मागणी पशुपालक शेतकऱ्यांकडून होत आहे. जनावरांचे आरोग्य आणि शेतकऱ्यांचे आर्थिक हित यांच्याशी संबंधित असलेला हा प्रश्न गांभीर्याने घेण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील पशुपालकांना वेळेवर पशुवैद्यकीय सेवा मिळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन रिक्त पदे भरण्यासाठी ठोस पावले उचलतील का, असा सवाल आता पशुपालकांमधून उपस्थित होत आहे.

# नेपाळच्या चिलिमे बोगद्यात बचावकार्याला वेग; अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी पर्यायी मार्ग तयार

नवी दिल्ली, दि. ७: २६ ऑगस्ट रोजी आलेल्या विनाशकारी पुरानंतर आता नेपाळमधील चिलिमे परिसरातील बोगद्यात अडकलेल्या लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सातत्याने सुरू आहे. भारतीय लष्कराने बोगद्यातील अडथळा निर्माण झालेल्या भागापर्यंत पोहोचण्यासाठी पर्यायी मार्ग तयार करण्याचे काम वेगाने सुरू केले आहे. या मोहिमेत भारतीय लष्करासोबत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि सीमा रस्ते संघटना (बीआरओ) यांच्या पथकांचाही सहभाग आहे.



बचाव पथक अत्यंत अरुंद मार्गातून बोगद्याच्या आत प्रवेश करून शोधमोहीम राबवत आहे. भारतीय लष्कर आणि नेपाळी लष्कराच्या जवानांसोबत एनडीआरएफ चे पथकही या शोधकार्यात सहभागी झाले आहे. बोगद्याच्या आतील भागातील एंडोस्कोपिक कॅमेऱ्याने टिपलेली पहिली छायाचित्रेही समोर आली आहेत. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून बोगद्याच्या आतली परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. चिलिमे बोगद्याचा एक भाग ब्लॉक झाल्यामुळे बचाव पथक पर्यायी मार्ग तयार करत आहे. अडथळा निर्माण झालेल्या भागापर्यंत पोहोचणे आणि तेथे अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी सुरक्षित मार्ग तयार करणे, हा या पथकाचा मुख्य उद्देश आहे. भारतीय लष्कर, एनडीआरएफ आणि बीआरओचे जवान यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत.

या बचाव मोहिमेत ऑस्ट्रेलियातील प्रसिद्ध बोगदा तज्ज्ञ अर्नोल्ड डिक्स हे देखील घटनास्थळी उपस्थित आहेत. ते बचाव पथकाला तांत्रिक मार्गदर्शन देत असून, बोगद्याच्या आतील परिस्थितीचा अंदाज घेऊन बचावकार्याबाबत आवश्यक सल्ला देत आहेत.

चिलिमे बोगद्यातील बचाव मोहिमेचे नेतृत्व कर्नल परीक्षित मेहरा करत आहेत. यापूर्वी उत्तराखंडमधील सिल्क्यारा बोगदा दुर्घटनेत ४१ मजुरांच्या यशस्वी बचाव मोहिमेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. सिल्क्यारा बोगद्यात १८ दिवस चाललेल्या बचाव मोहिमेनंतर सर्व ४१ मजुरांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले होते. कर्नल मेहरा अरुणाचल प्रदेशातील सेला बोगद्याच्या बांधकामाशीही संबंधित होते. त्यांचा अनुभव लक्षात घेता, नेपाळमधील चिलिमे येथे सुरू असलेल्या बचाव मोहिमेत त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

सध्या बचाव यंत्रणांचे संपूर्ण लक्ष बोगद्यात अडकलेल्या लोकांपर्यंत पोहोचून त्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यावर आहे. या मोहिमेत सहभागी सर्व पथके सातत्याने काम करत असून, पर्यायी मार्गाच्या माध्यमातून शक्य तितक्या लवकर अडकलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू आहेत.


**VERTOZ**

**व्हर्टोज लिमिटेड**

(पूर्वीचे नाव: व्हर्टोज ॲडव्हर्टायझिंग लिमिटेड)

**नोंदणीकृत कार्यालय:** ६०२, एव्हिओर, निर्मल गॅलेक्सी, जॉन्सन अँड जॉन्सन समोर, एलबीएस मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, भारत – ४०० ०८०.

**कॉर्पोरेट कार्यालय:** ए-१०१, पहिला मजला, इमारत क्र. ८, प्लॉट क्र. ३, माइंडस्पेस-ऐरोली (पूर्व), ऐरोली रेल्वे स्थानकासमोर, नवी मुंबई ४००७०८.

**कॉर्पोरेट ओळख क्रमांक :** L74120MH2012PLC226823

**दूरध्वनी:** +९१ २२ ६१४२ ६०३०; **फॅक्स:** +९१ २२ ६१४२ ६०६१

**संकेतस्थळ:** www.vertoz.com; **ईमेल:** compliance@vertoz.com

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या १५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि रिमोट ई-व्होटिंगची माहिती व कट-ऑफ तारखेचा तपशील**

प्रिय सदस्य,

१. याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीची **१५ वी (पंधरावी) वार्षिक सर्वसाधारण सभा (१५ वी एजीएम) मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'') / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांच्या (''ओएव्हीएम'')** सुविधेद्वारे आयोजित केली जाईल. ही १५ वी एजीएम, सदस्यांच्या एका सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, कंपनी कायदा २०१३ आणि त्याअंतर्गत तयार केलेले नियम; सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (यासोबतच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (''एमसीए'') द्वारे जारी केलेले सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ आणि सामान्य परिपत्रक क्र. ०९/२०२४, ९/२०२३, १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२० यांचा संदर्भ); तसेच सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (''सेबी'') द्वारे जारी केलेले परिपत्रक दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ (यासोबतच परिपत्रके दिनांक ७ ऑक्टोबर २०२३, १२ मे २०२०, १५ जानेवारी २०२१, १३ मे २०२२, १५ जानेवारी २०२१, १२ मे २०२० यांचा संदर्भ) यांच्या लागू तरतुदींचे पालन करून आयोजित केली जात आहे.

२. कंपनीने एमसीए आणि सेबीच्या परिपत्रकांचे काटेकोरपणे पालन करून, २२ सप्टेंबर २०२८ या 'कट-ऑफ' तारखेपर्यंत कंपनीकडे किंवा संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे (''डिपॉझिटरीज'') ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत आहेत, त्यांना १५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२०२६ साठीचा एकात्मिक वार्षिक अहवाल (ज्यामध्ये ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक विवरणपत्र समाविष्ट आहे आणि ज्याचा उल्लेख यापुढे वार्षिक अहवाल असा केला जाईल) यांची इलेक्ट्रॉनिक प्रत ईमेलद्वारे पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. सदस्य केवळ व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे १५ व्या एजीएममध्ये सामील होऊ शकतात आणि सहभागी होऊ शकतात. १५ व्या एजीएममध्ये सामील होण्याची प्रक्रिया, तसेच 'रिमोट ई-व्होटिंग' आणि एजीएमदरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याच्या पद्धती यांबाबतच्या तपशीलवार सूचना १५ व्या एजीएमच्या सूचनेत नमूद केल्या आहेत. ''व्हीसी/ओएव्हीएम'' सुविधेद्वारे सहभागी होणाऱ्या सदस्यांची गणना कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०३ अन्वये कोरम निश्चित करण्याच्या उद्देशाने केली जाईल. १५ व्या एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर (https://vertoz.com/r/shareholders-meetings), कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध असलेल्या स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर (बीएसई लिमिटेड – https://www.nseindia.com/) आणि केफिनटेक टेक्नॉलॉजस लिमिटेड च्या वेबसाइटवर (https://www.kfintech.com/) देखील उपलब्ध असतील.

३. कंपनी आपल्या सर्व सदस्यांना केफिन टेक टेक्नॉलॉजीज लिमिटेड ('' केफिन टेक'') द्वारे रिमोट ई-व्होटिंग ('' रिमोट ई-व्होटिंग'') सुविधा उपलब्ध करून देत आहे, जेणेकरून ते वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करू शकतील. याव्यतिरिक्त, कंपनी वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान (''ई-व्होटिंग'') प्रणालीद्वारे मतदान करण्याची सुविधाही देत आहे. **वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी रिमोट ई-व्होटिंग किंवा सभेदरम्यान ई-व्होटिंग सुविधेचा लाभ घेण्याच्या पात्रतेसाठी कंपनीच्या संचालक मंडळाने मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६* ही कट-ऑफ तारीख निश्चित केली आहे.**

४. रिमोट ई-व्होटिंग/ई-व्होटिंग आणि वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होण्याबाबतची तपशीलवार प्रक्रिया सभेच्या सूचनेमध्ये दिली आहे.

१. रिमोट ई-व्होटिंग **शनिवार, २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भाप्रवे) सुरू होईल आणि सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भाप्रवे)** समाप्त होईल. **२८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर (भाप्रवे)** इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ई-व्होटिंग करण्यास परवानगी दिली जाणार नाही आणि त्यानंतर केफिन टेक द्वारे ती सुविधा बंद केली जाईल.

२. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स खरेदी करून भागधारक बनलेली आणि कट-ऑफ तारखेला (म्हणजेच २२ सप्टेंबर २०२६*) शेअर्स धारण करणारी कोणतीही व्यक्ती, सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणेच ई-व्होटिंगची प्रक्रिया पाळू शकते.

३. सदस्यांनी हे लक्षात घ्यावे की, एकदा का एखाद्या ठरावावर मतदान केले की, त्यानंतर त्यात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. ज्या सदस्यांनी सभेपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केले आहे, ते सभेत उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार नसेल.

४. इलेक्ट्रॉनिक मतदानाची प्रक्रिया एजीएमच्या सूचनेत दिली आहे. काही शंका असल्यास, आपण घत्रऋळपींशलह च्या https://evoting.kfintech.com या संकेतस्थळावरील 'सतत विचारले जाणारे प्रश्न (FAQs) विभाग पाहू शकता, किंवा १८००-३४५४००१ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधू शकता, अथवा evoting@kfintech.com वर विनंती पाठवू शकता.

५. सदस्यांना विनंती आहे की त्यांनी एजीएमच्या सूचनेतील सर्व टीपा, तसेच एजीएममध्ये सहभागी होण्याबाबतच्या सूचना आणि ई-मतदान किंवा एजीएम दरम्यान ई-मतदान करण्याच्या पद्धतीबाबतच्या सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

**एजीएम-पूर्व सूचना पाठवताना, कट-ऑफ तारीख चुकून २५ सप्टेंबर २०२६ अशी नमूद केली गेली होती; ती प्रत्यक्षात २२ सप्टेंबर २०२६ अशी असायला हवी होती. योग्य कट-ऑफ तारीख २२ सप्टेंबर २०२६ ही आहे.*

**व्हर्टोज लिमिटेडसाठी**
**(पूर्वीचे नाव: व्हर्टोज ॲडव्हर्टायझिंग लिमिटेड)**
**सही/-**
**नूपुर जोशी**
**कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी**
**सदस्यत्व क्रमांक: ए४३७६८**

**दिनांक:** ८ सप्टेंबर २०२६
**ठिकाण:** मुंबई


# अमरावतीमधील भ्रष्टाचाराच्या आरोपांवर प्रशासनाचे स्पष्टीकरण; व्हेंटिलेटर खरेदीत ४५ लाखांची बचत

अमरावती, दि. ७: डफरीनमधील आगीच्या पार्श्वभूमिवर शासकीय रुग्णालयांसाठीच्या व्हेंटिलेटर खरेदीत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत असताना प्रशासनाने खरेदी पारदर्शक आणि ऑनलाइन पद्धतीने झाल्यामुळे शासनाचे ४५ लाख ३९ हजार रुपये वाचल्याचा दावा केला आहे. इर्विन रुग्णालयासाठी २० उच्च गुणवत्तेच्या व्हेंटिलेटर खरेदीबाबत अधिष्ठाता डॉ. स्मिता सोनटक्के यांनी ही माहिती दिली. या संपूर्ण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारच्या निधीचा अपव्यय झालेला नसून, अत्यंत योग्य गुणवत्तेची खात्री करूनच ही खरेदी करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

वैद्यकीय शिक्षण व आयुष आयुक्त (मुंबई) यांच्या तांत्रिक मान्यतेने आणि जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रशासकीय मंजुरीने ही खरेदी करण्यात आली होती. निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. निवड करण्यात आलेले व्हेंटिलेटर हे स्वित्झर्लंड येथील जगप्रसिद्ध हॅमिल्टन कंपनीचे असून, निर्मल एजन्सी या कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यामार्फत ही खरेदी झाली. हे व्हेंटिलेटर जागतिक मानकानुसार आणि प्रमाणित आहेत. पुरवठादाराची निवड करताना जीएसटी, उद्यम व शॉप ॲक्ट, अशा सर्व कायदेशीर कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली.

व्हेंटिलेटर चालवण्यासाठी लागणाऱ्या कन्झ्युमेबल्सचा वारंवार तुटवडा भासू नये, रुग्णसेवेत खंड पडू नये म्हणून त्याच किमतीमध्ये दोन वर्षे पुरतील इतके अतिरिक्त कन्झ्युमेबल्स समाविष्ट करण्यात आली आहेत. तसेच या किमतीमध्ये दोन वर्षांची संपूर्ण वॉरंटी देखील अंतर्भूत आहे. एका व्हेंटिलेटरसाठी २४ लाख ८२ हजार ५०० रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली होती. मात्र, पारदर्शक निविदा प्रक्रियेमुळे सर्वांत कमी दर २२ लाख ५५ हजार ५४४ रुपये इतका प्राप्त झाला होता. परिणामी, एका व्हेंटिलेटरमागे दोन लाख २६ हजार ९५६ रुपयांची बचत झाली असून, संपूर्ण खरेदीत शासनाचे एकूण ४५ लाख ३९ हजार १२० रुपये वाचले आहेत, असा त्यांचा दावा आहे.

# तांत्रिक बिघाडामुळे कोच्चीहून अबू धाबीकडे जाणारे एअर इंडिया एक्स्प्रेसचे विमान माघारी

तिरुवनंतपुरम, दि. ७: कोच्चीहून अबू धाबीकडे जाणाऱ्या एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाला उड्डाण घेतल्यानंतर अवघ्या ५० मिनिटांत तांत्रिक बिघाडामुळे माघारी परतावे लागले. विमानाच्या एका इंजिनमधील ऑईल प्रेशर धोकादायक पातळीवर पोहोचल्याने वैमानिकांनी खबरदारीचा निर्णय घेत विमान कोच्ची येथील कोचीन आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षितपणे उतरवले. या घटनेमुळे विमानातील प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, विमानाचे सुरक्षितपणे लँडिंग झाल्याने मोठा अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, एअर इंडिया एक्स्प्रेसचे आयएक्स ४१५ हे बोईंग ७३७ विमान कोच्चीहून अबू धाबीच्या दिशेने रवाना झाले होते. उड्डाणानंतर सुमारे ५० मिनिटांनी हे विमान तब्बल ३६ हजार फूट उंचीवर असताना पायलट आणि को-पायलट यांच्या लक्षात इंजिन क्रमांक एकमधील तेलाची पातळी वेगाने कमी होत असल्याचे आले.